**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.६७/२०२३**

**महा. शासन वि. बबन शंकर गुरव**

**निशाणी क्रमांक - ८/सी**

**सरकारी पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ शपथेवर कथन करतो की-**

माझे नाव - योगराज सर्जेराव दळवी

वय - ३७ वर्षे, व्यवसाय - नोकरी

राहणार - शिंगणापूर, ता: करवीर , जि: कोल्हापूर

**सरतपास सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील श्री.एस.बी.कांबळे यांचे मार्फत -**

**१.** दि.२६/०३/२०२३ रोजी मी राज्य उत्पादन शुल्क कागल येथे अतिरीक्तपणे सहा. दुय्यम निरीक्षक म्हणून कार्यरत होतो. सदरील दिवशी निरिक्षक साहेब यांना मिळालेल्या अवैध दारु विक्रीच्या गुप्त माहितीनुसार तळगाव येथे छापा टाकला. दोन पंच, मी, साहेब आणि रेडिंग स्टाफ असे खाजगी वाहनाने घटनास्थळी गेलो. सदरील ठिकाणी एक इसम आपले कब्जेत एक रबरी काळी इनर त्यात अंदाजे ३० लीटर गावठी हातभट्टी दारू, एक प्लॅस्टीक बादली, एक प्लॅस्टीक मग आणि पाच ग्लास असा एकुण रु. १८००/- चा मुद्देमाल बाळगलेला मिळून आला. साहेबांनी त्याचेकडे चौकशी केली असता दारू विक्रीचा कोणताही परवाना नसलेचे त्यांनी सांगितले. साहेबांनी त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव बबन शंकर गुरव असे सांगितले.

**२.** सदरील मुद्देमाल जप्त केला. त्यातील दोन बाटल्या नमुणा पथकरणासाठी साहेबांच्या व पंचाच्या सहीचा कागद लावून लाखी सिल ने बंद केला. पंचनामा करून जप्त मुद्देमाल साहेबांनी आपले कब्जेत घेतला. कार्यालयात मी घडले प्रकाराबाबत रीतसर फिर्याद दिली. आता मला ती दाखवण्यात आली. त्यावर माझी सही असून त्यातील

मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि. P9/PW1** देण्यात येते. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहे. मुद्देमाल पाहिल्यास ओळखू शकतो.

**सरतपास पुर्ण**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ वकील श्री.यु.एम.मानकर यांचे मार्फत -</u>**

**३.** हे म्हणणे खरे आहे की, आजरोजी न्यायालयासमोर मुद्देमाल हजर नाही. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही स्थानीक पंच घेतलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, या कामातील पंचांनी राज्य उत्पादन शुल्कच्या अनेक कामांमध्ये पंच म्हणून काम पाहिलेले आहे. आम्ही आरोपीकडे कोणीही बोगस गि-हाईक पाठवले नव्हते. आरोपीकडे सदरील वेळी दारू पिणारे कोणी मिळून आले नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ रिकामी जागा असलेमुळे त्या जागेवर कोणीही येऊ-जाऊ शकते.

**४.** हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात खोटा मजकूर नमूद केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, बेकायदा दारू विक्रीच्या केसेस आम्ही दाखल करतो. हे म्हणणे खरे नाही की, केसेस दाखविणेकरीता आरोपीविरुद्ध खोटी फिर्याद दाखल करून आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Sd/-

राधानगरी **(एन. पी. काकडे)**

दिनांक.०३/०१/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, राधानगरी